# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-२९ दिनांक - ०२/०२/२०२४

## मा. पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. यांनी नयानगर व इतर ठिकाणी घडलेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने व्यापारी वर्गाची बैठक घेवून मार्गदर्शक सुचना दिलेबाबत.



श्री. राम मुर्ती प्राण प्रतिष्ठापना, आयोध्या येथे दिनांक २२.०१.२०२४ रोजी आयोजीत कार्यक्रमाचे अनुषंगाने मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाण्याचे हद्दीत दिनांक २१.०१.२०२४ रोजी हिंदु व मुस्लिम गटामध्ये घार्मिक कारणावरुन वादावादी होवुन सदर घटनेचे व्हीडीओ, मेसेज सोशल मिडीयाचे माध्यमातुन अतिशीघ्रपणे व्हायरल झाल्याने त्याचे जनमानसात विपरीत परिणाम उमटुन नयानगर पोलीस ठाणे तसेच इतर पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता.

मा.श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, धार्मिक तेढ वाढू नये याकरीता रविवार दिनांक २८.०१.२०२४ रोजी २०.०० वा. काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील व्यापारी वर्ग यांची बैठक आयोजित करून त्यांना कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखणेकरीता संपर्कातील जास्तीत जास्त लोकांना शांतता राखणेकरीता आवाहन करणे तसेच सोशल मिडीयावर धार्मिक भावना दुखावणारे मेसेज, व्हीडीओ, फोटो, स्टेटस प्रसारीत न करणे व केल्यास होणारी कारवाई, अफवांवर विश्वास न ठेवणे, अधिकृत माध्यमाव्दारे मिळणा-या बातम्यांवर विश्वास ठेवणे, इ. सुचना दिल्या. अशा प्रकारच्या मिटींग सर्व परिमंडळात आयोजित करण्यात येणार आहेत.

सदर वेळी मा.श्री मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिभाववि, श्री जयंत बजबळे, पोलीस उपायुक्त, परि. १, मिरारोड, श्री महेश तरडे, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड व श्री राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस ठाणे हे उपस्थित होते.